# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०७/०४/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शनिवार दिनांक ०७/०४/२००७ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. ०२/०४/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ६) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ११) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १३) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| २) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ३) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |

**मा. सभापती सो. :-**

सभेला सुरूवात करा.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्रमांक १ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. १ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. ०५/१२/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. ०५/१२/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, सदरचा भाईंदर (पू.) रेल्वे फाटक पाण्याच्या टाकी समोरील रस्ता जंक्शन पर्यंत आहे. त्याची काही आवश्यकता नाही. तरी या सदरच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत नाही, असा मी ठराव मांडत आहे.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. २ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रविंद्र माळी :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

श्री. खांबित साहेब कुठे आहे? त्याच्यात विषय नाही का? पुढचा विषय घ्या.

**रोहिदास पाटील :-**

रस्त्याचे काय केले?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, रस्त्याची काय गरज नाही. तिथे ऑलरेडी रस्ता मजबूत आहे. आणि डांबरीकरण झालेले आहे. म्हणून आपण आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत नाही. कारण, आपल्या वॉर्डमध्ये कामे भरपूर आहेत. त्यांनी सांगितले आहे की, आता निधी उपलब्ध झाला म्हणून इथे गरज नाही. म्हणून आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत नाही, असा ठराव मांडलेला आहे आणि सन्मा. सदस्य रविंद्र माळी यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव नामंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०२ :-**

भाईंदर (पूर्व) रेल्वे फाटक पाण्याच्या टाकी समोरील रस्ता जंक्शन पर्यंत मजबुतीकरण करणेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

(सदरचा ठराव मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार नामंजुर करण्यात आला.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापतीच्या परवनगीने बोलतो, आपल्याकडे निधी सल्लागार आपल्या महापालिकेच्या कार्यसेवेमध्ये आहे. त्याचबरोबर आपण त्यांना एक सहाय्यक म्हणून दिलेले आहे. आता त्यामध्ये आणखी दुसरा एक विधी सहाय्यक नेमण्याची गरज नाही. मी असा ठराव मांडतो की, सदर जो आहे तो विधी सहाय्यक ठेवून दुसरा विधी सहाय्यक घेऊ नये असा मी ठराव मांडतो.

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

दुसरा विधी सल्लागार नेमण्याची गरज नाही. महापालिकेच्या केसेसचा कुठलाही निकाल लागलेला नाही मग कशाला दुसरा विधी सल्लागार पाहिजे?

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०३ :-**

विधी विभागात कार्यरत असलेले विधी सहाय्यक यांना मुदतवाढ देणे व एक नविन विधी सहाय्यक नेमण्यास मान्यता देणे.

**ठराव क्र. ०२ :-**

दि. ०५/१०/२००६ रोजी मा. स्थायी समिती यांचा ठराव क्र. १०२ अन्वये विधी विभागात विधी सहाय्यक यांची नेमणूक करण्यात आली होती. सदर ठरावाच्या अनुषंगाने श्री. प्रशांत एम. कोरगांवकर यांची दि. १३/१०/२००६ रोजी ठोक मानधनावर ५ महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात आली. तरी विधी सहाय्यक श्री. प्रशांत कोरगांवकर यांची पाच महिन्यांनी मुदत दि. १३/०३/२००७ रोजी संपलेली असून सदर विधी सहाय्यक यांनी चांगल्या प्रमाणे काम केलेले आहे. तरी विधी विभागातील कामाचा निस्तारा करणेसाठी श्री. प्रशांत कोरगांवकर यांची विधी सहाय्यक म्हणून एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि. १५/०३/२००७ पासून ठोक मानधनावर पाच महिन्यांकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच नविन विधी सहाय्यकाची आवश्यकता नसल्याने त्यांची नेमणूक करण्यात येवू नये.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

मी विषय मांडतोय चौपाटी...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब सदर विषयचा गोषवाराच नाही.

**रतन पाटील :-**

गोषवाराच दिलेला नाही. विषय कोणी मांडला आहे? इथे विषय कसा आलेला आहे?

**मा. सभापती सो. :-**

हा विषय रितसर पुढे येऊ द्या मी सांगतो हा विषय गोषवाऱ्यासकट येऊ द्या. तुम्ही पुढचे बोला.

**रोहिदास पाटील :-**

आता विषय घेतलेलाच आहे. तर ऐकून घ्या.

**मा. सभापती सो. :-**

मी डिटेल सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मी विषय काय आहे ते सांगतो. आपण आपल्या ठरावानुसार आपण प्रभाग अधिकाऱ्याला चौपाटीवर भाडे आकारण्यासाठी अनेक भाडे आकारण्यासाठी परवानगी दिलेली आहे. चौपाटीवर भाडे आकारण्यासाठी एकच उपाय आहे. आता जर, एक कार्यक्रम असताना दुसरा कोण गेला की ते प्रभाग अधिकारी असे सांगतात की, चौपाटी बुक आहे. मग ते त्यांना अडचण होते किंवा आपण त्यांना परवानगी देऊन एकाचे दोन मैदान झाले. --- तो एक मैदान आणि त्याच्या पुढे आणखी एक मोठे मैदान झालेले आहे. म्हणजे कोणाला विरोधाचा तक्रारीचा असे काही नाही. हा विषय तक्रारीचा विषय नाही. तुम्ही ऐकून घ्या. तुम्ही हा विषय पुढे ढकलले तरी त्यास माझा विरोध नाही. तुम्ही ऐकून घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की सदरचा जो विषय आहे...

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेबांना मी तेच सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. तुम्ही ते ऐकून घ्या. चौपाटीवर आता दोन मैदाने झाली. प्रभाग अधिकाऱ्यांना आपण दिलेल्या अधिकारानुसार एकच पावती फाडता येईल. म्हणजे त्याच्यासमोर जर दोन जण कोणीतरी गेले, की म्हणजे पहिल्या एकाने फाडले्ले आहे. परत चौपाटीची पावती फाडता येत नाही. आपल्याला अशी विनंती आहे की, महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने त्यांना दुसऱ्या ठिकाणी पावती फाडण्याचा अधिकार द्यावा जेणेकरुन एक मैदान आणि एक धर्मस्थळ असे दोन जागा झालेल्या आहेत. त्याचदिवशी दोन्ही मोठेमोठे कार्यक्रम होतात. आता झाले आहेत. पण झाले तर कधी झाले? तिथे मला जायला लागले की, नगरसेवक म्हणून सांगतो. त्यांनी सांगितले की, 'काका' तुम्हाला 'नाही' म्हणून सांगत नाही. पण आम्हाला अधिकार नाही. रितसर अधिकार आले तर चांगले आहे. मी ठराव वाचतो तेही ऐकून घ्या. ते जर चुकीचे असेल तर फेटाळून लावा.

(सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी प्रकरण क्र. ४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रतन पाटील :-**

आपण त्याच्यावर जागेवरती भाडे कसे आकारणार?

**रोहिदास पाटील :-**

आपल्या माहितीसाठी सांगतो. आपण भाडे प्रतिदिन १००० रु. आकारतो. एखादा कार्यक्रम होत नाही की तो सहा सात दिवस अगोदर तंबू बांधायला लागतो. आता त्या प्रभाग अधिकाऱ्याला काही माहिती पडत नाही की सहा दिवस आधी तंबू बांधणार आहे. तो दोन दिवस आधी बुकिंगला जातो. त्याची पावती फाडतो आणि आतामध्ये दोघांचेही भांडण झाले. तो म्हणतो की, मी पावती फाडली आहे तर तो म्हणतो की, 'हमारा इतना बडा कार्यक्रम है। एक दिन में तंबू कैसा बनेगा। म्हणून त्या प्रभाग अधिकाऱ्यांनी पावती जप्त केली म्हणून पावती फाडतेवेळी त्याला विचारून घ्यायचे की, तुमचे मंडपचे तंबूचे काम कधी चालू होईल? तर दोन दिवस आधी चालू होईल. तर दोन दिवसासाठी प्रतिदिन ५००-५०० रु. भरा. आणि कार्यक्रमाचे १००० रु. महानगरपालिकेचे उत्पन्न निघते आणि आम्ही तिथे राहतो म्हणून आम्हाला तेथे मानसिक त्रास होतो.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलत आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, ह्यांचा चांगला मुद्दा आहे. पण आपल्याला जेवढे भाडे मिळायला पाहिजे तेवढे भाडे आपल्याला त्या पद्धतीने मिळत नाही. भाडेमध्ये कुठेतरी वाढ झाली पाहिजे. उत्पन्नाच्या दृष्टीने तुम्ही चांगला मुद्दा घेतला आहे. एका वेळेचे दोन-दोन पावत्या फाडल्या पाहिजे. उत्पन्नसुध्दा वाढले पाहिजे. आपण नुसते १००० रु. भाडे....

**रोहिदास पाटील :-**

एका ठिकाणी दोन पावत्या फाडतील भाडे न वाढवता ह्याला दोन्ही पावत्या फाडायला परवानगी द्यावी असा माझ ठराव आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब असे आहे की, एखादा कार्यक्रम लहान असतो, एखादा कार्यक्रम मोठा असतो. आता समजा जर मी लहान कार्यक्रम केला तर मी १००० रु. देणार आणि जर सन्मा. सदस्य रतन पाटील साहेबांनी मोठा कार्यक्रम केला ते सुध्दा हजार रु. देतील. ते म्हणजे...

**रोहिदास पाटील :-**

मग त्यासाठी जो मोठा कार्यक्रम करतो. तो दोन दिवस आधी मंडप बांधतो, तीन दिवस आधी बांधतो तर त्याचे साडेतीन हजार रु. भाडे झाले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एरियावाईज घ्या.

**ग्रिटा फॅरो :-**

एरियावाईज घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावाला आमचा विरोध नाही. एरियावाईज घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब एरियावाईज घेतले तर आणखी वाढ चालू होतील. मग समजा रोहिदास पाटील यांनी पाचशे स्क्वेअर फूट एरिया घेतलेले आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब बोलतील तुम्ही मला उरलेले पाचशे द्या. एखादी दोन काम सिस्टिम असे होत नाही. ही दोन मैदाने दोन्ही सेपरेट होतील, ह्या मैदानात पण नाही आणि त्या मैदानात पण नाही. तिथेही कार्यक्रम वेगळा होऊ शकतो. आणि इथेही वेगळा होऊ शकतो. हा चांगला विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आम्ही तुम्हाला विरोध कुठे केला?

**शशिकांत भोईर :-**

आमचा असा विरोध नाही. स्क्वेअर मीटरप्रमाणेच करायचे आहे. जे भाडे आहे ना तसेच तुम्ही भले एक रु. ने स्क्वेअर मीटर लावा. काही हरकत नाही. परंतु, जी जागा आहे ती निश्चित केली पाहिजे. त्याला किती स्क्वेअर मीटर द्यायची कारण चौपाटी एकच आहे.

**मा. सभापती सो. :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की, नगरपालिकेचे उत्पन्न कुठून होईल? त्यांचे ते वक्तव्य आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, माझी सुचना अशी आहे की, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब यांनी जे मत मांडले त्याच्याशी मी सहमत आहे कारण जरी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब यांच्या म्हणण्याप्रमाणे दोन भाग असले तरी पुढचा एक भाग दुसरा आणखी पडतो. त्यानंतर आणखी पुढे भाग पडतो. मग त्यासाठी आपण निश्चित काय करणार? पूर्ण चौपाटी देणार की कसे करणार?

**रोहिदास पाटील :-**

एक चौपाटी दोन्ही मध्ये देणार.

**मा. सभापती सो. :-**

त्यांनी दोन भाग नमूद केले आहे.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, मी तुमच्याशी सहमत आहे.

**रोहिदास पाटील :-**

दोन मंडप आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

पण तुमचा एरिया किती स्क्वेअर फूट आहे?...

**शशिकांत भोईर :-**

एरिया वर द्या.

**ग्रिटा फॅरो :-**

एरिया नमूद करुन घ्या.

**शशिकांत भोईर :-**

एरिया नमूद करावे लागेल.

**शशिकांत भोईर :-**

आपण नाहीतर सार्वजनिक बांधकामाशी संगनमत करु या की किती भाडे ठरवायचे? कारण त्यांना भाडे ठरवण्याचा आधिकार आहे ना. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब मी तुमच्याशी सहमत आहे.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब एरियावाईज जर ठरवले तर कोणीतरी येऊन सांगणार की त्यांनी म्हात्रे साहेबांनी पाचशे रु. भरलेले आहे. उरलेल्या जागेवर मी पावती फाडतोय. मग दोन स्पीकर दोन

गेट, दोन बाजू होणार. ही दोन मैदाने सेपरेट आहे. त्या मैदानातला माणूस इकडे नाही. ह्या मैदानातला माणूस तिकडे नाही.असा मी ठराव लिहिलेला आहे. आता ते उत्पन्न वाढते आहे. एकदम कशाला घेऊ या. ते पुढच्यामध्ये घेऊ या.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब यांच्या सुचनेशी मी सहमत आहे. पण विरोध झाला नाही पाहिजे. तुमच्या नागरिकांनाच नाहीतर आमच्याही नागरिकांना सोय उपलब्ध होईल. परंतु, त्याचे स्क्वेअर मीटरमध्ये डिवायडेशन झाले पाहिजे. नाहीतर जो सुटेल तो लांबपर्यंत जाईल कारण आपली घोडबंदरपर्यंत चौपाटी आहे. मग तुम्ही, हजार रु. देणार का? मग हा ठराव पुढे कार्यान्वित होईल.

**रोहिदास पाटील :-**

चौपाटी घोडबंदरपर्यंत जात नाही. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, तुम्ही लक्षात कसे घेत नाही दोन मैदाने कोणती ती ते तुम्ही वाढवू शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

पण ती मैदाने किती स्क्वेअर मीटर आहेत ते सार्वजनिक बांधकामाने मोजले पाहिजे.

**मा. सभापती सो. :-**

सन्मा. सदस्य पाटील साहेब, आपण ही चर्चा नंतर घेऊ या. आपण पहिले पुढचे विषय घेऊ या. त्यानंतर आपण ह्याविषयी चर्चा करु या.

**रोहिदास पाटील :-**

ह्याला होय म्हणा आणि विषय संपवा.

**मा. सभापती सो. :-**

ह्यांना चर्चा करायची आहे. आपण चर्चा करु या. मी तुम्हाला वेळ देतो.

**रोहिदास पाटील :-**

हा विषय पुढे ढकलायचे आहे का?

**मा. सभापती सो. :-**

पुढे ढकलायचे नाही.

**रोहिदास पाटील :-**

मग, ठराव मंजूर करुन टाका. संपले.

**जयंत पाटील :-**

त्याचा स्क्वेअर मीटर ठरवावे लागेल. आपल्याला ती जागा मोजायला लागेल.

**मा. सभापती सो. :-**

त्यासाठी मी सांगतो हा विषय स्थगित ठेवा, म्हणज`आपण...

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही पेंडींगला ठेवतात. तर स्क्वेअर मीटर किती लावायचा ते सांगा.

**शशिकांत भोईर :-**

स्क्वेअर मीटर तसे....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बांधकाम विभागाने..

**शशिकांत भोईर :-**

बांधकाम विभागाने स्क्वेअर मीटर काढावे ना एवढे स्क्वेअर मीटर आहे.

**रोहिदास पाटील :-**

बांधकाम विभागाने स्क्वेअर मीटरप्रमाणे योग्य दर लावले असेल तर द्या ते ठरवा.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आपण भाडयाने जे शाळेचे मैदाने देतो. त्याचे आपण प्रॅक्टिकल रेट ठरवले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाचा दर वेगळा आहे. लग्नकार्य किंवा इतर त्याच दर वेगळा आहे. काही धार्मिक कार्यक्रम आहे त्याचा दर आपण वेगळे ठरवले आहेत. अशा पद्धतीने आहेत. अशा पध्दतीने तुम्ही करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

एक ॲकोकेशन करा.

**मा. सभापती सो. :-**

त्यासाठीच मी बोलतोय की आपल्याला वेळ लागेंल. नंतर आपण चर्चा करु या. अगोदर पुढचे विषय घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, चौपाटीची निश्चित एरिया किती द्यायची?

**रोहिदास पाटील :-**

त्यामध्ये तुमचे शब्द घ्या की, एरिया ठरवून भाडे लावा.

**मा. सभापती सो. :-**

एरिया धरून भाडे लावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण संपूर्ण अधिकार मा. आयुक्त साहेबांना देऊन टाकू.

**रोहिदास पाटील :-**

चालेल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही स्टॅण्डींगला मिटींगमध्ये आणणार तर तुम्ही मा. आयुक्त साहेबांना कुठेमध्ये आणत आहात.

**मा. आयुक्त :-**

या बाबतीमध्ये धोरण जे आहे ते मा. स्थायी समितीने ठरवायचे आहे.

**मा. सभापती सो. :-**

धोरण ठरवून द्या. त्याप्रमाणे अंमजबजावणी करु या.

**जेन्वी अल्मेडा :-**

धोरण ठरवायला व्यवस्थित तेथे गोषवारा यायला पाहिजे. त्याची माहिती यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

या बाबतीमध्ये तुम्हाला निर्णय घ्यायचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमचा ठराव पास करायचा आहे पण ह्याच्यामध्ये....

**रोहिदास पाटील :-**

ठराव पास करा. श्री. खांबित साहेबांना सांगितले होते ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मला काय सांगायचे नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

आम्ही बोलतो ना, ठराव पास करायचा आहे. आम्ही 'नाही' बोलत नाही.

**रोहिदास पाटील :-**

ठराव पास करा ज्या चांगल्या सुचना असतील महानगरपालिकेच्या फायद्याच्या सुचना असतील तर तसे सांगा विषय पेंन्डीग कशाला ठेवता? पेडीग ठेवू नका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, ह्यामध्ये आपण एक मार्ग काढू या. सगळे ठराव पास करु या. आणि ह्याचे जे काही रेट आहेत. ते पुढच्या स्थायी समितीमध्ये पास करु या.

**मा. सभापती सो. :-**

तसे नमूद करा. तसे रेकॉर्डिंगला येऊ द्या.

**ग्रिटा फॅरो :-**

तसे नमूद करून घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्यास माझे अनुमोदन आहे. परंतु, त्या ठरावामध्ये जे भाडे नमुद केलेले आहे त्या भाडयावर संपूर्ण तपशीलवार माहिती बांधकाम विभागाने आपल्याला द्यावी. यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम असतील, ह्याच्यामध्ये भाडे किती ठरवायचे त्यामध्ये एरिया किती असेल या सगळ्या गोष्टीची तपशीलवार माहिती बांधकाम विभागाने द्यावी.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०४ :-**

चौपाटी भाडे आकरणेबाबत.

**ठराव क्र. ०३ :-**

जेसलपार्क चौपाटीचा आज मोठ्याप्रमाणात विकास झाला असून आज चौपाटीवर विविध कार्यक्रम होतात त्या कार्यक्रमाच्या दृष्टीने व महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने चौपाटीवर १) मैदान २) दशक्रिया विधी ३) गुलाब बाग (नानानानी पार्क) ४) धर्मस्थळ (सुदामाधाम) ५) गणपती विसर्जन ६) हॉलीबॉल मैदान व योगासन मैदान अशी रचना तयार झाली असुन एकाच वेळी मैदान व सुदामाधाम या ठिकाणी दोन कार्यक्रम होवू शकतात म्हणून दोन्ही कार्यक्रमांनी परवानगी देण्यात यावी त्याचबरोबर दोन्ही कार्यक्रमांचे वेगवेगळे भाडे आकारावे. कार्यक्रमाचे स्वरूप बघून मैदानात मंडप किती दिवस आधी बांधणार त्यानुसार भाडे आकारणी करावी. कार्यक्रम संपल्यानंतर १ दिवसाचा गॅप ठेवून दुसऱ्या कार्यक्रमाचे बुकींग करावे. किंवा दोन्ही पार्टीमध्ये समझोता करून भाडे पावती फाडावी. सुदामाधाम धर्मस्थळ हे पुज्य सदानंद बाबा व पुज्य धर्मेन्द्रजी महाराज ह्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भुमी आहे. त्याभुमीचे पावित्र्य राखण्यासाठी तेथे मद्यपान, मांसाहार व अंमली पदार्थाचे सेवन होणार नाही याची खबरदारी घ्यावी तसेच कोणत्याही कार्यक्रमात होणाऱ्या खानपान व्यवस्थेचे

तंबू समुद्रकिनारी बांधण्यात यावे. कार्यक्रमाचे दिवसाचे भाडे किती आकारावे याचा तपशिलवार माहिती बांधकाम विभागाने येणाऱ्या स्थायी समितीमध्ये देण्यात आल्यानंतर ठरावाची अंमलबजावणी करावी. लग्नसोहळ्यासाठी चौपाटीवर परवानगी देण्यात येवू नये. तसेच ध्वनिक्षेपकांचा आवाज कमीत कमी असावा. तसेच योगासन मैदानामध्ये कोणताही तंबू किंवा कार्यक्रम होवू देउ नये.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो आपल्याला महापालिकेने आतापर्यंत किती मलःनिसारण केद्रांमधून...

**शशिकांत भोईर :-**

मला ह्याचा गोषवाराच मिळाला नाही. तुम्ही मला गोषवारा कुठे दिला? मला गोषवारा दाखवा. या चर्चेकरिता जेसल पार्क मलःनिसारणकेंद्रामधून जेसल पार्क मार्गांना आकारण्यात येणार विशेष कराबाबत पण गोषवारा द्या. आपण किती कर आकारतो. किती कर कमी करायचा आहे, किती वाढवायचा आहे?

**मा. सभापती :-**

पुढच्या वेळी गोषवारा येऊ द्या.

**रतन पाटील :-**

पुढच्या वेळी गोषवारा येऊ द्या. आणि गोषवाऱ्यासकट हा विषय येऊ द्या.

**रोहिदास पाटील :-**

गोषवारा येईपर्यंत हा विषय पेंडिंग ठेवायला काही हरकत नाही. मी सगळ्यांना तो विषय समजावा म्हणून सांगत आहे की, तो विषय मंजूर करा. असे मी मी म्हणतच नाही. कारण तो विषय आर्थिक बाबीचा आहे. आणि मी आग्रहही धरणार नाही. मा. सभापती साहेब, मिरा-भाईंदर मध्ये एकमेव विशेष स्वच्छता कर आकारताये तो फक्त जेसल पार्क. अन्य कुठेही नाही आणि त्याचबरोबर मिरा-भाईंदरमध्ये संपूर्ण भाईंदर (प.), भाईंदर (पू.), मिरारोड, काशिमिरा किंवा पेणकर पाडा किंवा उत्तन येथील सगळ्या नागरिकांचा रोजचा उपक्रम चालूच आहे. मग धुणं, मलमुत्र, कपडे धुतात, आंघोळ करतात सगळे. आणि हे करतेवेळी महापालिका कोटयावधी रुपये खर्च करते. जसे आपण बघा की गोउदेव नाका ते नवघर तेथे आपण तीन कोटी रु. चे गटार बांधले. ते गटार साफ करण्यासाठी आपण लाखो रु.चे टेंडर देतो. ते गटार तुंबले की परत आपण लाखो रु. चे दुरुस्ती खर्च लावतो. पण या जेसल पार्कमधल या सिव्हिल फ्लॅटवर आपला वेगळा खर्च होत नाही. आणि त्या ठिकाणी त्या लोकांना नगरपरिषदेचा ठराव होत की दोन टक्क्यांनी आकारणी करण्यात यावी. विविध महापालिकामध्ये फक्त ३ टक्क्यांनी आकारणी आहे. मी जे पत्र देऊन मा. सभापतींना विनंती केली. की आपण ३ टक्केऐवजी ४ टक्केचा टॅक्स लावावा. चार टक्के टॅक्स लावून जी काही रक्कम जमा होईल ती अर्धी नागरिकांची आणि अर्धी महापालिकेची आहे. ते महापालिकेचे नैतिक कर्तव्य आहे. कम्पलसरी डयुटीमध्ये तो भाग आहे. त्यामुळे हा पूर्ण पैसा त्या लोकांकडून वसूल करणार हे योग्य नाही. मी माहितीसाठी सांगतो की, कर विभागाने सन्मा. सदस्य पाटील साहेबांनी दिलेली माहिती म्हणजे जी काही जमवाजमव असेल तेही रेकॉर्डिंगला येऊ दे की ही खरी माहिती नाही. अधिकारी या पद्धतीने काय करतात? मी चार-पाच-सहा दिवस मा. सभापतींना सांगून मी सारखी ती माहिती घेत होतो. खर्च काय जमा काय ह्याला कुठेतरी कागदावर येऊ द्या. खर्च जास्त असेल तरी ठिक आहे. खर्च कमी असेल तरी ठिक आहे. पण त्यांनी काढलेले आकडे त्यांच्याच रेकॉर्डप्रमाणे आहेत ते बरोबर नाही. कारण ती सगळी कागदे माझ्याकडे आहे. त्यांच्याकडूनच घेतली आहे. त्यांच्याच सहीच्या आहेत. त्यांनीच दाखवले आहे की, १ कोटी ६१ लाख रु. खर्च झाला आणि १ कोटी १८ लाख रुञ जमा झाले हे आकडे नाही. १ कोटी ५२ लाख रु. खर्च झाला आणि १ कोटी ५८ लाख रु. जमा झाले हे अक्षरशः फिगर आहे. आता तुम्हांला गोषवारा दिला नसल्यामुळे मी येथे काही जास्त बोलत नाही. पण हे खरे आहे की, त्यांनी केलेले आकडेमोड हे चुकीचे आहेत. ते दुरुस्त करुन सगळ्या सभागृहाने त्याच्यावर सद्‌विचेकबुध्दीने विचार करावा.

**मा. सभापती :-**

गोषवारा येऊ द्या.

**रोहिदास पाटील :-**

माझी मा. सभापती साहेबांना विंनती आहे की, हा टॅक्स संपर्ण त्यांच्याकडून वसूल न करता अन्य-अन्य महापालिकेमध्ये ३ टक्के टॅक्स आहे. आपण ४ टक्के टॅक्स लावले पाहिजे. अशी मी चर्चा करतो. आणि नंतर याचा रितसर गोषवारा येऊ देत.

**मा. सभापती :-**

ह्याचा रितसर गोषवारा येऊ द्या.

**रतन पाटील :-**

त्याचबरोबर गोषवारा येऊन महापालिकेच्या अन्य जी मलःनिसारण केंद्र आहेत त्याची संपूर्ण माहिती येऊ द्या. आपल्याला कर आकारणी संदर्भात प्रोव्हिजन करायची आहे. त्यामुळे तो पूर्ण गोषवारा पुढच्या मा. स्थायी समितीमध्ये येऊ द्या.

**प्रकरण क्र. ५ :-**

जेसल पार्क मलनिःसारण केंद्रामधुन जेसलपार्क नागरिकांना आकारण्यात येणा-या विशेष स्वच्छता कराबाबत.

(सदरचा विषय मा. सभापती सो. यांच्या ओदशानुसार तहकूब करण्यात आला.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०६ :-**

निविदांना मंजुरी देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ०४ :-**

अ) दि.१६/०३/२००७ रोजीच्या दै. हमारा महानगर व दै महाराष्ट्र जनमुद्रा या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार (प्रथम फेर निविदा सुचना क्र.१४) प्राप्त निविदा idnaaMk २६/०३/२००७ raojal ]GaDNyaat Aalyaa. %yaabaabatcaa tpSalla KalaIlap`maaNa Aaho.

**सी. आय. (एस. ॲन्ड एस.) टायटन पाईप्स** (LA- Class) **आय. एस. नं १५३६:२००१ आणि समकक्ष** ISO/B.S **स्टॅंडर्डप्रमाणे १०० मीमी ते ५०० मीमी व्यासाचे पुरवठा करणे.**

AMdaijat r@kma :.. रू. २,२७,७९,४१५/-

| **व्यास** | **मे. विंध्या ट्रेडर्स** | **मे. केशरी ॲन्ड कंपनी** | **मे. कपिलांश धातु उद्योग प्रा.लि.** |
|---|---|---|---|
| | **निविदेचा दर (रू.)** | **निविदेचा दर (रू.)** | **निविदेचा दर (रू.)** |
| **१०० मि.मी** | **८८९/-** | **९०५/-** | **९२०/-** |
| **१५० मि.मी** | **१३६६/-** | **१३९०/-** | **१३९९/-** |
| **२०० मि.मी** | **१९७६/-** | **२०१०/-** | **२००५/-** |
| **२५० मि.मि** | **२६४७/-** | **२६६०/-** | **२६५०/-** |
| **३०० मि.मि** | **३३९५/-** | **३५५०/-** | **३४५६/-** |
| **३५० मि.मि** | **४६२०/-** | **४७९५/-** | **४७५०/-** |
| **४०० मि.मि** | **५७४०/-** | **५८६०/-** | **५८४२/-** |
| **४५० मि.मि** | **७०१४/-** | **७१९५/-** | **७२७५/-** |
| **५०० मि.मि** | **८४३७/-** | **८५९२/-** | **८६५०/-** |

imara Baaa[-Mdr mahanagarpailaka hVItIla ivaivaQa p`BaagaaMmaQyao AavaSyaktonausaar जलवाहिन्या अंथरणेसाठी पाईप पुरवणेबाबत spQaa-<mak inaivada (दर) maagaivaNyaat आलेले haoते. p`aPt निविदांपैकी savaa-t kmaI dracaI मे. विंध्या ट्रेडर्स यांची आहे. **सबब मे. विध्या ट्रेडर्स यांची निविदा मंजूर करणेस व या कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.**

ब) id.०३/०२/२००७ रोजीच्या दै. सन्मित्र व दि. ०४/०२/२००७ रोजीच्या दै. नवशक्ती yaa vaR<ap~aMt p`isaQd krNyaat Aalaolyaa जाहीर निविदे सुचनेनुसार (निविदा सुचना क्र.१५) प्राप्त निविदा idnaaMk १३/०२/२००७ raojal ]GaDNyaat Aalyaa. उपरोक्त कामांकरीता तयार करण्यात आलेली प्राकलने ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील सन २००५-०६ च्या जिल्हा दर सुची नुसार तयार करण्यात आलेली आहेत. सदर प्राकलना नुसार होणाऱ्या रक्कमेस निविदा रक्कम अथवा अंदाजित रक्कम गृहीत धरूनच ठेकेदाराने दर प्रस्तावित केलेले आहेत. मात्र आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील सन २००५-०६ ची जिल्हा दर सुची प्राप्त झालेली आहे. सादर केलेले दर कमी करणेबाबत निविदाकारांकडे विचारणा केली असता त्यांनी दर कमी केलेले आहेत. %yaabaabatcaa tpSaIla KalaIlap`maaNa Aaho.

**१) भाईंदर (पुर्व) विभागातील गावदेवी चाळ, हनुमान मंदिर ते प्रथमेश इमारत, जैन नगर, नवघर गाव व इतर परिसरात सी.आय. जलवाहिनी टाकणे.**

AMdaijat r@kma :.. रू. १२,३९,६५६/-

| **zokodaracao naava** | **देकार** |
|---|---|
| **मे. . राजेश एन्. विशे** | **१२.६० % जादा दराने** (वाटाघाटीअंती जिल्हा दरसुची (२००६-०७ नूसार प्राप्त दर ३.५०% **जादा दराने**) |
| **मे. संदेश डी बुटाला** | **१४.२०% जादा दराने** |
| **मे. एस. एन. इंटरप्राईजेस** | **१४.९०% जादा दराने** |

**२) भाईंदर (पु) विभागात राजा रामदेव पार्क, निर्मल पार्क, लोढा कॉम्पलेक्स, साईकृपा कॉम्पलेक्स ते न्यु गोल्डन नेस्ट पर्यंत व परिसरात सी.आय.जलवाहिनी टाकणे.**

AMdaijat r@kma :.. रू. १४,१२,९२८/-

| **zokodaracao naava** | **देकार** |
|---|---|
| **मे. . राजेश एन्. विशे** | **१२.४२ % जादा दराने** (वाटाघाटीअंती जिल्हा दरसुची २००६-०७ नूसार प्राप्त दर २.०१% **जादा दराने**) |
| **मे. संदेश डी बुटाला** | **१४.६० % जादा दराने** |
| **मे. एस. एन. इंटरप्राईजेस** | **१४.९० % जादा दराने** |

**३) भाईंदर (प.) विभागातील मोदी पटेल रोड, राम मंदिर रोड, बॉम्बे मार्केट, क्रांती नगर व परिसरात सि. आय.जलवाहिनी टाकणे.**

AMdaijat r@kma :.. रू. १४,९१,८६८/-

| **zokodaracao naava** | **देकार** |
|---|---|
| **मे. एस. एन. इंटरप्राईजेस** | **१२.५० % जादा दराने** (वाटाघाटीअंती जिल्हा दरसुची २००६-०७ नूसार प्राप्त दर ३.३४% **जादा दराने**) |
| **मे. संदेश डी बुटाला** | **१४.१० % जादा दराने** |
| **मे. राजेश एन्. विशे** | **१४.५० % जादा दराने** |

**४) भाईंदर (प.) विभागातील आनंद नगर, भोला नगर, आंबेडकर नगर, देवचंद नगर व परिसरात सी.आय जलवाहिनी टाकणे.**

AMdaijat r@kma :.. रू. १२,७८,००४/-

| **zokodaracao naava** | **देकार** |
|---|---|

| | |
|---|---|
| मे. . राजेश एन्. विशे | १२.६० % जादा दराने (वाटाघाटीअंती जिल्हा दरसुची २००६-०७ नूसार प्राप्त दर ३.५०% जादा दराने) |
| मे. एस. एन. इंटरप्राईजेस | १४.०० % जादा दराने |
| मे. संदेश डी बुटाला | १४.९० % जादा दराने |

५) मिरा रोड (पु) विभागातील जनता नगर, लक्ष्मी बाग (काशी), मिरा गाव व परिसरात सि. आय. जलवाहिनी टाकणे.

AMdaijat r@kma :.. रू. १३,०६,६७२/-

| **zokodaracao naava** | **देकार** |
|---|---|
| मे. एस. एन. इंटरप्राईजेस | १२.४१ % जादा दराने (वाटाघाटीअंती जिल्हा दरसुची २००६-०७ नूसार प्राप्त दर ३.१२% जादा दराने) |
| मे. संदेश डी बुटाला | १४.२५ % जादा दराने |
| मे. राजेश एन्. विशे | १४.९२ % जादा दराने |

६) मिरा रोड (पु) विभागातील आझाद नगर, गावदेवी नगर नं.१, गिता नगर फेज ६, रॉयल कॉलेज ते सृष्टी से.नं.२ येथे सि.आय जलवाहिनी टाकणे.

AMdaijat r@kma :.. रू. ११,४०,२०४/-

| **zokodaracao naava** | **देकार** |
|---|---|
| मे. राजेश एन्. विशे | १२.६० % जादा दराने (वाटाघाटीअंती जिल्हा दरसुची २००६-०७ नूसार प्राप्त दर १.१३% जादा दराने) |
| मे. संदेश डी बुटाला | १४.२५ % जादा दराने |
| मे. एस. एन. इंटरप्राईजेस | १४.९२ % जादा दराने |

७) मुर्धा ते उत्तन विभागातील शिवप्रसाद आगर, बुबु आगर, मोठा आगर, सदानंद नगर व रेवा आगर व परिसरात सी.आय जलवाहिनी टाकणे.

AMdaijat r@kma :.. रू. १४,४९,१६०/-

| **zokodaracao naava** | **देकार** |
|---|---|
| मे. एस. एन. इंटरप्राईजेस | १२.४१ % जादा दराने (वाटाघाटीअंती जिल्हा दरसुची २००६-०७ नूसार प्राप्त दर ३.५४% जादा दराने) |
| मे. संदेश डी बुटाला | १५.१० % जादा दराने |
| मे. राजेश एन्. विशे | १४.५० % जादा दराने |

८) मुर्धा ते उत्तन विभागातील नवि खाडी, भाटेबंदर, वेलंकनी चर्च, धारावी मंदीर, पातान बंदर व परिसरात सी.आय जलवाहिनी टाकणे.

AMdaijat r@kma :.. रू. १६,६०,४३७/-

| **zokodaracao naava** | **देकार** |
|---|---|
| मे. एस. एन. इंटरप्राईजेस | १२.४१ % जादा दराने (वाटाघाटीअंती जिल्हा दरसुची २००६-०७ नूसार प्राप्त दर ३.५३% जादा दराने) |
| मे. संदेश डी बुटाला | १५.१० % जादा दराने |
| मे. एकॉर्ड मार्केटींग | १६.१० % जादा दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १,२,४ व ६ या कामांकरीता मे. राजेश एन. विशे यांनी सादर केलेले दर हे लघुत्तम आहेत. तर अ.क्र. ३,५,७ व ८ या कामां करीता मे. एस.एन एंटरप्रायजेस यांनी सादर केलेले दर हे लघुत्तम आहेत.

**सबब अ. क्र. १, २, ४ व ६ या कामांकरीता मे. राजेश एन. विशे यांची निविदा व अ. क्र. ३, ५, ७ व ८ या कामांकरीता मे. एस. एन. एंटरप्राईजेस यांची निविदा मंजूर करणेस व या कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.**

क) दि.१२/०१/२००७ रोजीच्या दै. नवशक्ती व दै. जनमत yaa vaR<ap~aMt p`isaQd krNyaat Aalaolyaa जाहीर निविदे सुचनेनुसार (निविदा सुचना क्र.१३(२००६-०७) प्राप्त निविदा idnaaMk २२/०१/२००७ raojal ]GaDNyaat Aalyaa. %yaabaabatcaa tpSalla KalaIlap`maaNa Aaho.

दैनंदिन देखभाल / दुरुस्ती साठी हत्यारे व अवजारे पुरवठा करणे.

(अंदाजित किंमत रू. २२.१५ लक्ष )

| साहित्य | मे. श्री गौरव ट्रेडर्स | मे. विंध्या ट्रेडर्स | मे. केशरी ॲन्ड कंपनी |
|---|---|---|---|
| | निविदेचा दर (रू.) | निविदेचा दर (रू.) | निविदेचा दर (रू.) |
| **Item No.1** | | | |
| Ratchet pipe threader 1/2" to 2" | १२४००/- | १२५००/- | १२७५०/- |
| **Item No.2** | | | |
| Self Locking pipe vice with stand (H.D.)<br>50 mm<br>80 mm | <br><br>६६५०/-<br>८०००/- | <br><br>६७००/-<br>८०५०/- | <br><br>६९००/-<br>९०००/- |
| **Item No.3** | | | |
| Pipe Wrench (H.D.) 10"-12"-14"-18"-24"-36" | १२०००/- | १२५००/- | १३०००/- |
| **Item No.4** | | | |
| Chain pipe wrench (H.D.) 3"-4"-6"-8" | २१०००/- | २२५००/- | २२६००/- |
| **Item No.5** | | | |
| Chain Pipe Wrench double end 3"-4"-6"-8" | २४८००/- | २५१००/- | २५४००/- |
| **Item No.6** | | | |
| Pipe Cutter<br>2"<br>3"<br>4" | <br>१०८०/-<br>२०९०/-<br>३२५०/- | <br>११००/-<br>२१००/-<br>३३००/- | <br>१२५०/-<br>२२००/-<br>३५००/- |
| **Item No.7** | | | |
| Rotary Pipe Cutter For C.I.<br>3" to 6"<br>6" to 9"<br>9" to 12"<br>12" to15"<br>15" to 18"<br>21" to 24" | १५८५०/-<br>२३९००/-<br>३२८००/-<br>५५१५०/-<br>६१९००/-<br>७९८००/- | १६०००/-<br>२४०००/-<br>३३०००/-<br>५५३३०/-<br>६२१००/-<br>८०१००/- | १७०५०/-<br>२५०००/-<br>३४५००/-<br>५५४५०/-<br>६३९००/-<br>८१०००/- |
| **Item No.8** | | | |
| Hinged Pipe Cutter for C.I. Pipe<br>3" to 6"<br>6" to 9" | <br>१६८३०/-<br>२६१५०/- | <br>१७०००/-<br>२६५००/ | <br>१७५००/-<br>२६९००/- |
| **Item No.9** | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| Tapping And Drilling Machine | १२८३०/- | १२९००/- | १३२००/- |
| **Item No.10** | | | |
| Combined tap And Drilling Machine<br>1/2"<br>3/4"<br>1" | २४५०/-<br>३१५०/-<br>४२९०/- | २६००/-<br>३३५०/-<br>४८००/- | २७००/-<br>३४००/-<br>५०००/- |
| **Item No.11** | | | |
| Gear Chain Pully block with tripod<br>3.00 Ton<br>5.00 Ton | ६०५००/-<br>८८८५०/- | ६१३००/-<br>८९०००/- | ६२५००/-<br>९१२००/- |
| **Item No.12** | | | |
| Tool Kit For Plumber and Fitter | ४८९००/- | ४९०००/- | ५१०००/- |
| **Item No.13** | | | |
| Power clearer heavy duty rooter 250mm Automatically feed | १४४८५०/- | १,४५०००/- | १४५९००/- |
| **Item No.14** | | | |
| Spair wheel for C.I. Cutter<br>3" to 6"<br>6" to 9"<br>9" to 12"<br>12" to15"<br>15" to 18"<br>21" to 24" | २४००/-<br>२४५०/-<br>२६००/-<br>२७५०/-<br>२९००/-<br>४४५०/- | २५१०/-<br>२५५०/-<br>२६५०/-<br>२८००/-<br>३०००/-<br>४५१०/- | २६००/-<br>२६१०/-<br>२६९०/-<br>२९००/-<br>३२००/-<br>४६५०/- |
| Spair wheel for C.I. Cutter<br>3" to 6"<br>6" to 9"<br>9" to 12"<br>12" to15"<br>15" to 18"<br>21" to 24" | २४००/-<br>२४५०/-<br>२६००/-<br>२७५०/-<br>२९००/-<br>४४५०/- | २५१०/-<br>२५५०/-<br>२६५०/-<br>२८००/-<br>३०००/-<br>४५१०/- | २६००/-<br>२६१०/-<br>२६९०/-<br>२९००/-<br>३२००/-<br>४६५०/- |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. श्री. गौरव ट्रेडर्स यांनी सादर केलेली लधुत्तम दराची निविदा वाजवी व संयुक्तीक आहे.

**सबब मे. श्री. गौरव ट्रेडर्स यांची निविदा मंजूर करणेस व या कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. ७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

आरोग्य विभागाच्या निविदांना मंजूरी देणेबाबत...

**शशिकांत भोईर :-**

मी ठराव केलेला आहे. त्याच्यात अनुमोदन दिलेले आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

कोणी?

**शशिकांत भोईर :-**

माझी विनंती आहे की, त्यावर चर्चा करायला हरकत नाही. कारण त्यामध्ये सेटिंग झालेले आहे.

**मा. सभापती :-**

ठराव वाचा.

**मा. सभापती :-**

विरोध नमुद करण्यांत येईल.

**शशिकांत भोईर :-**

विरोध नोंदवा आणि याची चौकशी श्री. रविंद्र पाठक साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली व्हावी कारण ह्यामध्ये पूर्ण भ्रष्टाचार झालेला आहे. महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. या विषयावर सभा तहकुब करावी. असा ठराव मांडत आहे. अनुमोदन द्या.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा ह्यांनी प्रकरण क्र. ७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

ठराव आता दोन झाले आहे. तुम्ही घाई करु नका.

**मा. सभापती :-**

ठराव वाचण्याची कुठली रीत झाली. ठरावाचे वाचन कुठल्या पध्दतीने झाले?

**शशिकांत भोईर :-**

माझा प्रश्न असा आहे की, ह्या ज्य निविदा आलेल्या आहेत त्या आवाक्याबाहेर आहेत. २५ टक्के दराने अगोदर झाल्यानंतर मा. आयुक्त साहेबांसमोर बसून ९ टक्के झाल्या. परंतु, ज्यावेळेस निविदा काढल्या त्यावेळेस आपल्य शासनाने ही मंजुरी दिली होती कीश त्यांचा प्रोव्हिडंड फंड, बोनस या रक्कमा धरुनच निविदा काढल्या असतील ना. परंतु, तसे करुनसुध्दा ९ टक्के अबॉव्ह आहेत. तद्नंतरच्या पावत्या फाडल्या गेल्या. त्या क्रमवारी गटक्रमांकाने आणि सिरीअलप्रमाणे आहेत आता त्यामध्ये प्रशासनाचे लेखी उत्तर माझ्याकडे आहे. बघा खाजगीकरणाबाबत गटनिहाय प्रभाग साफसफाई कामाच्या निविदाबाबात. अनुक्रमांक, गटक्रमांक अशाप्रमाणे पावतीची योजना केलेली आहे. तुम्ही बघा. अनुक्रमांक १, गटक्रमांक १ गुडलक कन्स्ट्रक्शन कंपनी पावती क्रमांक १७२३५१. गटक्रमांक १ मेसर्स आशापुरा कन्स्ट्रक्शन कंपनी पावती क्रमांक १७२३५२. गटक्रमांक १ मेसर्स संकल्प ट्रेडींग कंपनी पावती क्रमांक १७२३५३. गटक्रमांक १ श्री. साई गणेश कन्स्ट्रक्शन पावती क्रमांक १७२३५४. पुन्हा दोन क्रमांकाचे लगेच फाडले. ह्यामध्ये कुठेही तुलनात्मक मागे पुढे झाले नाही. नंतर ३, ४ गटक्रमांकाप्रमाणे फज्ञउले. नंतर ह्यामध्ये सेटींग झालेली होती आणि तरी त्यामध्ये ९ टक्के अबोव्ह आहेत. तर ह्याची चौकशी होणे गरजेचे आहे आणि सदर ठराव श्री. रविंद्र फाटक साहेबांच्या निदर्शनास यावा. कारण ते नगरविकास अधिकारी आहेत. ह्याच्यात सेटींग झालेले आहे. म्हणून माझा विरोध आहे. तुम्ही विरोध नोंदवा. मी ठराव मांडलेला आहे. अनुमोदन झालेले आहे. आवश्यक असल्यास आपल्याला ह्यावर तत्पुरती चर्चा करायची करायची असेल तर आपा एक मिटींगसाठी सभा तहकुब करावी.

**मा. सभापती :-**

तुम्ही मला आदेश देणार की, सभा तहकुब करण्याचे आणि मी तहकुब करणार हा कुठला नियम आहे? तुमचा निर्णय कुठला आहे?

**शशिकांत भोईर :-**

ह्यावर तहकुब करा असा मी ठराव मांडतो. कारण ह्यामध्ये भ्रष्टाचार .............

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण ह्याच्यावर चर्चा करुया. मग, आपण त्यावर निर्णय घेऊ या. त्यावर दोन ठराव झाले आहे. आपण त्याच्यावर चर्चा करु या.

**नगरसचिव :-**

मा. सभापती साहेब, दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांनी मांउलेला आहे. त्यास अनुमोदन सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी दिले आहे. व दुसरा ठश्राव सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा ह्यांनी मांडलेला आहे. त्यास अनुमसेदन सन्मा. सदस्य ग्रिटा फॅरा ह्यांनी दिलेले आहे. दोन ठराव असल्यामुळे त्याच्यात ...........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्यांनी सभा तहकुबाची घोषना केलेली आहे. असे व्हायला पाहिजे नाही. हा जो ठराव मांडलेला आहे. तो कॅन्सल होता कामा नये. ह्यांनी जर ऑब्जेक्शन उचलले की मग कॅन्सल होतो.

**नगरसचिव :-**

बहुसंख्य सदस्यांच्या मंजुरीने सभा तहकुब होते. अशी डायरेक्ट होत नाही. सर्व सदस्यांच्या मान्यतेने सभाग तहकुब होते. दोन ठराव आले आहेत तर मतदान घ्यावे लागेल. हात वरती करुन मतदान घ्यावे लागेल.

**गीता जैन :-**

पाच-दहा मिनिटे चर्चा केली तर काही बिघडत नाही. त्यांना समजूत घालू देत. पटले तर ठिक आहे. पहिल्यांदाच अशी मतदानाची वेळ आली आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्यावर काम सुरुच आहे. प्रशासनाने कारवाई केली आहे. मी तिथे काल रात्री बघितले आता दगडाचे काम सुरु आहे. तिथे गटारावर काम सुरु केले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण ज्यावेळी मा. स्थायी समितीमध्ये चर्चा केली. मी मागच्यावेळी एन.ओ.सी. बद्दल जो विषय काढला होता. हाउस शाखेची एन.ओ.सी. आहे. त्या एन.ओ.सी. बद्दल मागे मा. स्थायी समितीमध्ये भरपूर चर्चा झाली. त्याच्या विक्रीकरता आपण अर्ज केले होते. म्हणजे एखादा फ्लॅट ........

**मा. सभापती :-**

विषय कोणता चालू आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण जी स्टॅन्डीगची मिटींग तहकुब केली होती त्यात असा विषय होता की, ती बिल्डींग अजूनही चालू आहे. मी तेच सांगत आहे की, साहेब आपण मागे चर्चा केली होती आणि तेव्हा तुम्ही सांगितले होते की मी त्याचा निर्णय इमिजिएटली देतो. हा जो एन.ओ.सी. चा विषय आहे. तो विषय तपासून, बघून मी जे अधिकारी आहेत ते कुठल्याही एका व्यक्तीला देवून टाकतो आणि त्याचे काम जेणेकरुन लोकांना फास्ट होईल सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांचा विषय वेगळ आहे. माझा विषय वेगळा आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांचा तो विषय वेगळा आहे.

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मागच्या वेळी आपण मा. स्थायी समितीमध्ये हे काम तहकुब केले होते किंवा काम बंद करण्यासाठी आपण ते पाठवले होते. पाच वाजेपर्यंत आपले कुठलेही पथक कोणीही तेथे गेले नव्हते. ह्यावेळी सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांनी आपल्याला फोन केला होता. आपण कुठल्यातरी एका कार्यक्रमामध्ये होतात तेव्हा ते पथक आले होते. म्हणजे पूर्ण सभा मा. स्थायी समितीतील ...........

**मा. आयुक्त :-**

आपण घेतली होती का?

**रतन पाटील :-**

आपण त्यावेळेला घेतली होती. पण ५ वाजता घेतली होती.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७ चे दोन ठराव आलेले आहे. पहिला ठराव सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी मांडलेला आहे. त्यास अनुमोदन सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी दिलेले आहे आणि दुसरा ठराव सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा ह्यांनी मांडलेला आहे व त्यास अनुमोदन ग्रिटा फॅरो यांनी दिलेले आहे. मी प्रथम दुसरा आलेला ठराव मतदानाला टाकतो.

**जयंत पाटील :-**

वाढीव दराने जे ९ टक्के आहे .........

**रोहिदास पाटील :-**

ज्यात परंपरावेळी चालूच असते. तेव्हा नविन कायदा येतो. ममा. आयुक्त साहेब , तुमचे जे इस्टमेट काढले त्यामध्ये त्या लोकांची, कर्मचाऱ्यांची प्रोव्हिडंड फंड किंवा ग्रॅज्युएटी हे सगळे काउंट झाले. त्यावेळी एखादा विषय होता की, ज्या एजन्सीचे आपण देतो आपण त्याबरोबर एजन्सी वेगवेगळी आणतात ते प्रशिक्षित आहे का? त्याची कार्यालये आहेत का? त्यावेळची पत्र आहेत का?

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब आपण दोन मिनिटे ॲन्टीचेंबरमध्ये जाउ या. म्हणजे कोणी इगो पॉईन्ट करु नका. सगळे सगळे प्रश्न मिटितील.

**मा. सभापती :-**

सभा दोन मिनिटासाठी तहकुब करतो.

**रतन पाटील :-**

संगणक विभागाचे सिस्टम मॅनेजर पदावर नविन कोणीतरी आलेले आहेत. त्यांची ओळख झालेली आहे. ते कुठल्या विभागातील आहेत?

**सिमा मिश्रा :-**

मेरा नाम सिमा मिश्रा है और मैने संगणक विभाग सिस्टम मॅनेजर पद पर ९ मार्च से जॉईन्ट किया है। धन्यवाद!

**मा. सभापती :-**

सभेला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

तहकुब सभेला सुरुवात होते.

**मा. सभापती :-**

ठराव मागे घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मी जो ठराव मांडलेला होता तो ठराव मी मागे घेतो आणि मी सभा सोडतो.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा ह्यांनी प्रकरण क्र. ७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावास माझ अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

दुसरा ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ७ :-**

निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र ०५ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील खाजगीकरणामार्फत गटनिहाय प्रभाग साफसफाई व घनकचरा अंतर्गत येणारी सर्व दैनंदिन कामे करणेकामी एकूण १६ गटाकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार १ ते १६ गटाकरिता नमुद केलेल्या अंदाजित वार्षिक खर्चावर ९ टक्के जादा दराने ही सभा मंजुरी देत असून सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांस दि. १ एप्रिल ते १५ एप्रिल पर्यंत दिलेल्या मुदतवाढीस मान्यता देत आहेत.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०८ :-**

मा. आयुक्त साो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र ०६ :-**

महापालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी आवश्यक औषधे पुरवठा करणेकामी निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळून मे. शाहा फार्मा, मे. विहार केमिस्ट ॲन्ड जनरल स्टोर्स, मे. झेनित मार्केटिंग सर्व्हिस, मे. कृष्णा मेडिकल ॲन्ड जनरल स्टोर्स या निविदाकारांनी निविदा भरल्या होत्या यापैकी मे. कृष्णा मेडिकल ॲन्ड जनरल स्टोर्स यांचा तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्र. १) अपूर्ण असल्यामुळे सदरची निविदा विचारात घेतली नाही.

उर्वरीत तीन निविदाकारांनी निविदेत सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| SR. NO | DESCRIPTION | SHAH PHARMA | | | VIHAR CHEMIST & GENRAL STORES | | | ZENITH MARKETING SERVICE | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | PACKING | RATE | M. F. G. BY | PACKING | RATE | M. F. G. BY | PACKING | RATE | M. F. G. BY |
| 1. | Tab. Ciprofloxacine 500mg. | 1 X 10 | 50.00 | Elder | 1 X 10 | 53.00 | Lyka | 1 X 10 | 51.00 | Ranbaxy |
| 2. | Tab. Cefadroxil 250 mg. | 1 X 10 | 31.00 | Sarabhai | 1 X 10 | 33.00 | Lyka | 1 X 10 | 32.50 | Lupin |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3. | Tab. Diclofenac 50 mg. + Paracetamol 500 mg. | 1 X 1000 | 250.00 | Densa / Shivalik | 1 X 1000 | 365.00 | Vikas | 1 X 1000 | 350.00 | National |
| 4. | Tab. Ibuprofen 400 mg. | 1 X 1000 | 310.00 | Shivalik | 1 X 1000 | 355.00 | Vikas | 1 X 1000 | 360.00 | Sanket |
| 5. | Syp. Furazolidone 25 mg. | 1 X 60 ML. | 7.60 | C. C. I. | 1 X 60 ML. | 8.50. | S. G. S. | 1 X 60 ML. | 8.00 | P. C. I. |
| 6. | Cream Micanazole | 1 X 15 GM. | 20.00 | Omega | 1 X 15 GM. | 23.00 | S. G. S. | 1 X 15 GM. | 22.00 | Cipla |
| 7. | Tab. Amoxicillin 250 mg. | 1 X 10 | 31.00 | Elder | 1 X 10 | 33.00 | Intas | 1 X 10 | 32.00 | Cipla |
| 8. | Tab. Paracetamol 500 mg. | 1 X 1000 | 155.00 | Glumex / National | 1 X 1000 | 190.00 | Euph oria | 1 X 1000 | 185.00 | National |
| 9. | Syp. Metronidazole 100 mg. | 1 X 60 ML. | 7.60 | C. C. I/ | 1 X 60 ML. | 8.75 | S. G. S. | 1 X 60 ML. | 8.50 | P. C. I. |
| 10. | Tab. Mebendazole 100 mg. | 1 X 6 | 5.95 | Omega | 1 X 6 | 7.75 | Manish | 1 X 6 | 7.25 | Densa |
| 11. | Tab. C. P. M. | 1 X 1000 | 25.00 | Relief | 1 X 1000 | 29.00 | National | 1 X 1000 | 27.50 | Vikram |
| 12. | Tab. Prednisolone 5 mg. | 1 X 1000 | 272.00 | Euporia | 1 X 1000 | 315.00 | National | 1 X 1000 | 310.00 | Vikram |
| 13. | Tab. Diethyl Carbamazine 100 mg. | 1 X 1000 | 105.00 | Densa | 1 X 1000 | 225.00 | Lyka | 1 X 1000 | 225.00 | Sanket |
| 14. | Syp. Amoxicilline 125mg. | 1 X 30 ML. | 17.00 | Elder | 1 X 30 ML. | 22.00 | Elder | 1 X 30 ML. | 20.00 | Lupin |

वरील तक्त्याचे अवलोकन करता मे. शाह फार्मा यांनी औषध पुरवठा करणेकामी सादर केलेले दर तिन्ही निविदाकारांच्या तुलनेत कमी आहे. मा. आयुक्त यांनी मे. शाह फार्मा यांनी सादर केलेली निवीदेतील दर मा. आयुक्त यांनी मंजुर केले आहे. महापालिका आरोग्य केंद्राकरिता औषध पुरवठा करणेकामी रू. ९,८७,१००/- खर्चास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

मा. स्थायी समितीच्या अवलोकनाकामी सादर

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९ चे वाचन केले.)

**मा. आयुक्त :-**

आम्हाला प्रशासनाने काय प्रस्तावित केले आहे ते सांगा.

**नगरसचिव :-**

मी ते सांगत आहे. प्रशासनाने मा. स्थायी समितीचे मा. सभापती, पाणी पुरवठ्याचे मा. सभापती, सर्व गटनेते, मा. स्थायी समितीचे सदस्य ह्यांची नावे आहेत. गटनेते सर्व आले.

**मा. सभापती :-**

तुम्ही सोळा मधून पाच करता आणि एक पेन्डींग ठेवता ते कशासाठी?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही मा. स्थायी समितीच्या सदस्यांची नावे द्या.

**मा. सभापती :-**

नावे द्या. समितीकडे गठीत करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांचेही नाव घ्या.

**मा. सभापती :-**

ते गटनेते आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, माझे गटनेते पद रद्द करा. पुढच्या मिटींगला आमचा दुसरा गटनेता येईल.

**मा. आयुक्त :-**

आपण उर्वरित पाणीपुरवठ्याचे जे मार्गी लावत आहे त्याच्यासाठी ही समिती आहे.

**रोहिदास पाटील :-**

किती देणार?

**मा. आयुक्त :-**

असे काही नाही.

**नगरसचिव :-**

ऑलरेडी सन्मा. सदस्य रविंद्र माळी आले आहेत.

**मा. आयुक्त :-**

ज्या ठिकाणी योजना अपूर्ण अवस्थेत आहे. त्याला विभागातून घ्या. आपण जे काही काम शिल्लक राहिलेले आहे आपण ती काही कामे मार्गी लावलेले आहेत. त्या कामाचा वेळोवेळी आढावा घ्यायचा. जेणेकरुन ते काम लवकरात लवकर पूर्ण व्हायला पाहिजे. ह्याच्यासाठी ते आहे.

**नगरसचिव :-**

मी नावे वाचून दाखवतो. मा. सभापती साहेब, रतन पाटील, जयंत पाटील, रोहिदास पाटील हे गटनेते म्हणून आले आहेत. रविद्र माळी, जेन्वी अल्मेडा, ग्रिटा फॅरो, ध्रुवकिशोर पाटील, हंसुकुमार पांडे हे गटनेते आहेत आणि गीता जैन.

**मा. सभापती :-**

आपण कमिटी नियुक्त करण्याआधी आपण जर एक महिन्यातून त्यांना जर बोलावले .........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण मागच्या वेळी श्री. बारकुंड साहेबांना सांगितले होते की, तुम्ही त्यांना बोलवा. गेले चार दिवस आपली मा. स्थायी समितीची बैठक जेव्हा चालू होती वेव्हा त्यांना सांगितले होते. पण त्यांनी बोलवले नाही.

**मा. सभापती :-**

तेव्हा टायमिंगसुध्दा घेतली ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

होय.

**शिवाजी बारकुंड :-**

टायमिंग घेतले होते. साहेब, त्या चिफ इंजिनियरशी बोलले होत. चिफ इंजिनियर आणि आपला वेळ बसत नव्हता आता त्यांच्याकडे ॲडिशनल मेंबरशिप तेथे चार्ज म्हणून आलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मग ही समिती स्थापन करण्यात काही मतलब नाही. जर त्यांना वेळच मिळत नाही तर समिती स्थापन करुन मतलब काय आहे?

**मा. आयुक्त :-**

समजा, आपण समिती जरी स्थापन केली ना तरी जे एक्झिकेटिव्ह इंजिनियर किंवा डेप्युटी इंजिनियर जे प्रत्यक्ष काम करतात त्यांनाच आपण बोलवणार आहे. आपल्या मिटिंगला चिफ इंजिनियर येणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर त्यांना बोलवले असते तरी आपले काम झाले असते. आपण त्यांना विचारले असते.

**मा. आयुक्त :-**

आपण ते काम आता मार्गी लावले आहेत. आपल्याला त्यांना १ कोटी रु. द्यायचे आहे. आपण पैसे दयायला एकदा सुरुवात झाल्यानंतर मग आपण त्या कामाचा आढावा सारख्या घेतला तर ती उर्वरित कामे पुर्ण होतील.

**रतन पाटील :-**

साहेब, ही ५० एम. एल. डी. पाण्यामधली जी कामे अर्धवट राहिले आहेत. त्या कामासाठी का?

**मा. आयुक्त :-**

होय. त्या कामासाठी दयायचे आहे.

**रतन पाटील :-**

आणि आता जो वाढीव पाणी पुरवठयाच्या संदर्भात आहे.

**मा. आयुक्त :-**

तो वेगळा विषय आहे. त्याचा येथे काही संबंध नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, त्याची वसुली बददल जरा सांगा आपल्या मिरा भाईंदरमध्ये तीन महिन्यापूर्वी पाणी येणार होते.

**मा. आयुक्त :-**

त्याबाबत सांगतो. पण, या बाबतीमध्ये आधी काहीतरी निर्णय घ्या.

**मा. सभापती :-**

मा. स्थायी समितीचे सदस्य........

**मा. आयुक्त :-**

त्यांना महिन्यातुन एकदा मा. स्थायी समिती समोर बोलवायचे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, पुढच्य येणा-या मा. स्थायी समितीमध्ये त्यांना बोलवून घ्या.

**मा. आयुक्त :-**

चालेल. काही हरकत नाही.

**मा. सभापती :-**

मा. स्थायी समिती सभा दिनांक १७/०१/२००७ रोजीचे प्रकरण क्रं १७० मधील अनुक्रमांक १२ तहकुब केलेले होते. त्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**प्रकरण क्रं ०९ :-**

मि.भा.मनपाच्या पाणीपुरवठा योजना अंतर्गत उर्वरीत कामे म.जि.प्रा. कडून पूर्ण करण्याकरिता वेळोवेळी आढावा घेणेसाठी आढावा समिती स्थापन करणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्रं ०७ :-**

मिरा भाईंदर शहरासाठी म.जि.प्रा. मार्फत ५० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी शासनाकडून ४७.८३ कोटी अनुदान मिळालेले आहे. रू. ५३.३१ कोटी एम.एम.आर.डी.ए. कडून वित्तिय सहाय्य कर्ज घेवून योजना राबविण्यात येत आहे. मार्च २००२ मध्ये रू. २ कोटी ८० लक्ष कर्जनिधी उपलब्ध न झाल्याने या योजनेतील काही उपांगे बंद होती. बंद असलेली कामे पुर्ण करण्यासाठी महानगरपालिकेकडे पाणीपुरवठा राखीव निधी मध्ये उपलब्ध असलेल्या शिल्लकेमध्ये रू. ३ कोटी १२ लक्ष म.जि.प्रा. स देण आवश्यक आहे. या योजनेतील अपूर्ण असलेल्या कामाबद्दल कामे पुर्ण होणेचे दृष्टीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४ चे (२) अन्वये मा. सभापती - स्थायी समिती, मा. सभापती - पाणी पुरवठा समिती, मा. स्थायी समितीचे सर्व सदस्य, मा. आयुक्त व कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा (सदस्य सचिव) यांची एक आढावा समिती स्थापन करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची मा. स्थायी समितीची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याचे वेळ :- दुपारी १२.२० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**